मुंबई विद्यापीठाच्या सुधारित अभ्यासक्रमावर आधारित

एफ.वाय. बी.ए (सेमी-II)

# समग्रलक्षी अर्थशास्त्र



डॉ. नंदिनी वेल्हणकर

जोत्स्ना एस. गुरव    सीमा उघाडे

NIRALI PRAKASHAN
ADVANCEMENT OF KNOWLEDGE

मुंबई विद्यापीठाच्या सुधारित अभ्यासक्रमावर आधारित

# समग्रलक्षी अर्थशास्त्र

## MACRO ECONOMICS

### एफ. वाय. बी. ए. सेमी SEM. II


❁ लेखक ❁

**डॉ. नंदिनी वेल्हणकर**

एम.ए., एम. फिल., पी.एच.डी
साहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख आणि उपप्राचार्या
डी.एस.पी.एम. चे के.व्ही. पेंढरकर,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
डोंबिवली (पूर्व), जिल्हा : ठाणे

**प्रा. जोत्स्ना एस. गुरव**

एम.ए., बी.एड., एम. फिल.
डी.एस.पी.एम. चे के.व्ही. पेंढरकर,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
डोंबिवली (पूर्व), जिल्हा : ठाणे

**प्रा. सीमा उघाडे**

एम.ए., अर्थशास्त्र
डी.एस.पी.एम. चे के.व्ही. पेंढरकर,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
डोंबिवली (पूर्व), जिल्हा : ठाणे


**किंमत : ₹ 55.00**


NIRALI PRAKASHAN
ADVANCEMENT OF KNOWLEDGE

N0428

**एफ.वाय.बी.ए. : समग्रलक्षी अर्थशास्त्र**
**प्रथम आवृत्ती : जानेवारी २०१७**
© : प्रकाशक
**क्रमांक : १७२६०१**

**प्रकाशक**
**निराली प्रकाशन**
अभ्युदय प्रगती, १३१२, शिवाजीनगर,
जंगली महाराज रोड, पुणे ४११ ००५.
फोन : (०२०) २५५१ २३३६/३७/३९
फॅक्स : (०२०) २५५१ १३७९.
Email : niralipune@pragationline.com

**(Poly Plates)**

**मुद्रक**
**योगिराज प्रिंटर्स अॅन्ड बाइंडर्स**
सर्व्हे नं. १०/१, घुले इंडस्ट्रिअल इस्टेट,
नांदेड गाव रोड, ता. हवेली,
पुणे - ४११ ०४१.
मो. : ९८५००४६५१७/९४०४२३३०४१

**पुस्तक मिळण्याचे ठिकाण**

**प्रगती बुक सेंटर : पुणे :** Email : pbcpune@pragationline.com

- १५७, बुधवार पेठ, रतन टॉकिजसमोर, **पुणे** २. ☎ (०२०) २४४५ ८८८७/६६०२ २७०७
- ६७६/ब, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिरासमोर, **पुणे** २. ☎ (०२०) ६६०१ ७७८४/६६०२ ०८५५
- २८/अ, बुधवार पेठ, अंबर चेंबर, अप्पा बळवंत चौक, **पुणे** २.
  ☎ (०२०) ६६२८ १६६९/०२०४ ०३३५
- १५२, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिराशेजारी, **पुणे** २. ☎ (०२०) ६६०९ २४६३/२४४५ २२५४
- इंदिरा निवास, शारदाश्रम हायस्कूलजवळ, १११/अ, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम),
  **मुंबई** २८. ☎ (०२२) २४२२३५२६/६६६२५२५४

**प्रमुख वितरण केंद्रे**

**निराली प्रकाशन : पुणे**

- ११९, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिर मार्ग, **पुणे ४११ ००२.**
  ☎ (०२०) २४४५ २०४४, ६६०२ २७०८. **फॅक्स :** (०२०) २४४५ १५३८.
  Email : niralilocal@pragationline.com

**निराली प्रकाशन : धायरी (पुणे)**

- सर्वे नं. २८/२७ धायरी-कात्रज रोड, पारी कंपनीजवळ, **पुणे ४११ ०४१.**
  ☎ (०२०) २४६९ ०२०४ **फॅक्स :** (०२०) २४६९ ०३१६.
  Email : bookorder@pragationline.com; dhayari@pragationline.com

**मुंबई**

- ३८५, एस.व्ही.पी. मार्ग, रसधारा को. ऑप. हाउसिंग सोसायटी लि., गिरगाव,
  **मुंबई** - ४०० ००४. ☎ (०२२) २३८५ ६३३९/२३८६ ९९७६
  **फॅक्स :** (०२२) २३८६ ९९७६. Email : niralimumbai@pragationline.com

**वितरक शाखा**

**निराली प्रकाशन :**

- ३४, व्ही. व्ही. गोलानी मार्केट, नवी पेठ, **जळगाव** - ४२५ ००१.
  ☎ (०२५७) २२२ ०३९५. **मो.** ९४२३४९१८६०

**Note :** Every possible effort has been made to avoid errors or omissions in this book. In spite this, errors may have crept in. Any type of error or mistake so noted, and shall be brought to our notice, shall be taken care of in the next edition. It is notified that neither the publisher, nor the author or book seller shall be responsible for any damage or loss of action to any one of any kind, in any manner, therefrom. The reader must cross check all the facts and contents with original Government notification or publications.

**इतर शाखा : बंगळुरु, चेन्नई, हैदराबाद, दिल्ली.**

info@pragationline.com • www.pragationline.com
To Order * Email : bookorder@pragationline.com Fax : (020) 2445 1538

# प्रस्तावना

मुंबई विद्यापीठातील बी.ए. भाग-1 या वर्गातील विद्यार्थी व अभ्यासू प्राध्यापकांच्या हाती **'समग्रलक्षी अर्थशास्त्र संकल्पना आणि व्याख्या'** (Macro Economics) सेमिस्टर II साठीचे हे पुस्तक देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे आणि खूप समाधानही वाटत आहे.

बी.ए. भाग-1 च्या नवीन अभ्यासक्रमानुसार हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात विषयाची मांडणी करताना अभ्यासक्रमाचे ध्येय साध्य होण्याच्या हेतूने यातील भाषा सोपी व सुटसुटीत ठेवण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे.

बी.ए. भाग - 1, सत्र 2 च्या विद्यार्थ्यांसाठी 'समग्रलक्षी अर्थशास्त्र' या अभ्यासक्रमाची एकूण चार घटकांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. समग्रलक्षी अर्थशास्त्र हा विषय अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडण्यात आला आहे.

**घटक 1 :** 'स्थूल अर्थशास्त्र संकल्पना आणि व्याख्या' यामध्ये स्थूल अर्थशास्त्र अर्थ, स्वरूप मुक्त अर्थव्यवस्थेतील चक्राकार प्रवाह, राष्ट्रीय उत्पन्नासंदर्भातील संकल्पना, स्थूल देशांतर्गत उत्पादन चलन संकोचक, खरेदीशक्ती समता, भारताच्या दृष्टीने जीडीपीची वृद्धी याबाबत सविस्तर विवेचन केले आहे.

**घटक 2 :** उपभोग, बचत आणि गुंतवणूक, राष्ट्रीय उत्पन्न, उपभोग फलन व गुंतवणूक फलन, भांडवलाची सीमांत कार्यक्षमता, व्याजदर प्रवेग तत्त्व, बचत फलन आणि भारतातील भांडवलनिर्मिती यांबाबत सविस्तर विवेचन केले आहे.

**घटक 3 :** 'शासन' या घटकामध्ये खासगी वस्तू, करआकारणी, करेतर महसुलाचे स्रोत, सार्वजनिक खर्च, तुटीचा अर्थभरणा, वस्तू व सेवा कर (G.S.T.) याबाबत चर्चा करण्यात आली आहे.

**घटक 4 :** व्यवहारतोल/व्यवहारशेष तसेच विनिमय दर, तिचे महत्त्व, प्रकार, फायदे-तोटे, विदेशी चलनसाठा, महत्त्व, परकीय चलनसाठा, उपाययोजना इत्यादी बाबींचा आढावा घेतला आहे.

हे पुस्तक लिहिताना त्या-त्या घटकांवरील वर्णन सोप्या व ओघवत्या भाषेत केलेले आहे. संदर्भासाठी काही मराठी व इंग्रजी पुस्तकांचा आधार घेतलेला आहे. आवश्यक त्याठिकाणी आकृत्यांचा उपयोग केला आहे.

निराली प्रकाशन पुणे या प्रकाशनसंस्थेचे श्री. दिनेशभाई फुरिया आणि श्री. जिग्नेशभाई फुरिया यांनी आम्हाला पुस्तक लेखनाची संधी दिली याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत.

या संदर्भ पुस्तकाचे विद्यार्थी आणि प्राध्यापकमित्रांकडून स्वागत होईल असा आम्हाला विश्वास वाटतो. या पुस्तकात अनावधानाने काही उणिवा वा त्रुटी असतील तर त्या आम्हाला जरूर कळवाव्यात, त्यांचे स्वागतच केले जाईल आणि पुढील आवृत्तीमध्ये त्या दुरुस्त करण्यास मदत होईल.

**- लेखकवृंद**

# SYLLABUS

## F.Y.B.A. Semester - II

### Economy

**Unit 1 : Concepts and Definitions**

Circular flow of income in an Open Economy-G.D.P-GNP-NNP-GDP Defiator - Real and Nominal quantitates - GDP at purchasing power parity - Exchange rate as a price - GDP Growth : India's experience - Trends in Growth Rate and Sectoral Composition of GDP - Sources of Data.

**Unit 2 : Consumption, Saving and Investment**

National Income Identity in an Open Economy - Keynesian Consumption Function - Investment Multiplier - Marginal Efficiency of Capital and Rate of Interest - Accelerator -Savings in India : Trends and Composition- Capital Formation in India : Trends and Composition- Sources of Data.

**Unit 3 : Government**

Public Goods and their Features - Merit Goods - Sources of Revenue : Direct and Indirect Tax - Impact, Shifting and Incidence of Tax - Sources of Non - Tax Revenue - Public Expenditure : Revenue and Capital Expenditure - Subsidies - Types of Deficit : Revenue, Budgetary, Fiscal and Primary - Concept of GST - Recent Trends - Sources of Data.

**Unit 4 : External Sector**

Structure of Balance of Payments - Types of Disequilibrium in BOP - Exchange Rate Determination - Concept of FOREX and its Components -Sources of Data.

# अनुक्रमणिका


1. स्थूल अर्थशास्त्र संकल्पना आणि व्याख्या 1.1 ते 1.24

2. उपभोग, बचत आणि गुंतवणूक 2.1 ते 2.40

3. शासन 3.1 ते 3.40

4. बाह्यक्षेत्र 4.1 ते 4.18

# 1

# स्थूल अर्थशास्त्र संकल्पना आणि व्याख्या

1.1 स्थूल अर्थशास्त्र

1.2 मुक्त अर्थव्यवस्थेतील चक्राकार प्रवाह

1.3 राष्ट्रीय उत्पन्नासंदर्भातील महत्त्वाच्या संकल्पना

1.4 स्थूल देशांतर्गत उत्पादन चलन संकोचक

1.5 खरेदीशक्ती समता

1.6 भारताच्या दृष्टीने जीडीपीची वृद्धी

## 1.1 स्थूल अर्थशास्त्र

### 1.1.1 समग्रलक्षी (स्थूल) अर्थशास्त्र – अर्थ व स्वरूप

***अर्थ***

Makros या मूळ ग्रीक शब्दापासून Macro हा इंग्रजी प्रतिशब्द तयार झाला, त्याला मराठीत समग्र असे म्हणतात. समग्रलक्षी अर्थशास्त्र म्हणजे आर्थिक विश्लेषणाची अशी शाखा की, जी एका विशिष्ट एककाच्या (Unit) आर्थिक वर्तनाचा अभ्यास न करता सर्वच एककांच्या सामूहिक वर्तनाचा अभ्यास करते. हा अभ्यास समग्रतेचा (Aggregate) असतो. म्हणून यास 'समग्रलक्षी अर्थशास्त्र' असे म्हणतात. समग्रलक्षी अर्थशास्त्राचा संबंध अर्थव्यवस्थेतील सर्व घटकांशी असतो.

समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या वेगवेगळ्या व्याख्या वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी केल्या आहेत. त्यातील महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

- ''स्थूल आर्थिक समुच्चयामधील संबंधांचा अभ्यास म्हणजे समग्रलक्षी अर्थशास्त्र होय.'' **– आर.जी. डी. ॲलन**

- ''समग्रलक्षी अर्थशास्त्र हे अर्थशास्त्राच्या अशा भागांचा अभ्यास करते की, ज्यांचा संबंध आर्थिक प्रणालीतील स्थूल बेरजा व सरासरी रकमा यांच्याशी येतो.'' **– बोल्डिंग**
- ''समग्रलक्षी आर्थिक सिद्धान्तात उत्पन्न, रोजगार, किमती व पैसा यांचा समावेश होतो.'' **– जे. एम. कॅलबर्ट्सन**
- ''एकूण रोजगार, एकूण बचत व एकूण भांडवल-गुंतवणूक आणि राष्ट्रीय उत्पन्न यांसारख्या समुच्चयातील संबंधांचा विचार करणारी अर्थशास्त्राची शाखा म्हणजे समग्रलक्षी अर्थशास्त्र होय.'' **– हॅन्सन**

वरील वेगवेगळ्या व्याख्यांवरून समग्रलक्षी अर्थशास्त्राची पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात.

1. समग्रलक्षी अर्थशास्त्र संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करते. संपूर्ण अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी व एकूण पुरवठा यांचे संतुलन पाहणे हा उद्देश या अर्थशास्त्राचा असतो.
2. वस्तू व सेवा यांचे एकूण उत्पादन, वस्तू व सेवांच्या किमतींची पातळी व उत्पादक साधनांचे उत्पादनातील सहभागित्व आणि रोजगार यांची निश्चिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न हे अर्थशास्त्र करते.
3. एकूण उत्पादन, एकूण रोजगार व सर्वसामान्य किंमतपातळी यांत बदल घडविणाऱ्या चलांचा (Variables) हे शास्त्र अभ्यास करते.

***स्वरूप***

**(1) समुच्चयात्मक दृष्टिकोन :** समग्रलक्षी अर्थशास्त्रात आर्थिक व्यवहारांच्या समुच्चयात्मक पातळीवरील अभ्यास केला जातो. उदाहरणार्थ - एकूण सेवा, वस्तूंची मागणी, त्या वस्तू व सेवांचा एकूण पुरवठा.

अर्थव्यवस्थेत आर्थिक व्यवहारात गुंतलेल्या हजारो वैयक्तिक घटकांच्या एकूण परिणामांचा विचार समग्रलक्षी अर्थशास्त्रात केला जातो तसेच सरासरी परिणामांचाही विचार केला जातो.

**(2) पैशात अभिव्यक्ती :** समग्रलक्षी अर्थशास्त्रामध्ये एकूण मागणी व एकूण पुरवठा यांचा विचार केला जातो. अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी म्हणजेच विविध वस्तू व सेवांच्या मागणीची एकूण बेरीज होय. परंतु विविध वस्तूंच्या मोजमापनाची परिमाणे वेगवेगळी असल्यामुळे त्यांची बेरीज करता येत नाही. उदाहरणार्थ - फळे, दूध, मोटार यांची बेरीज कशी करणार हा प्रश्न निर्माण होतो. यासाठी वस्तूंच्या किमतीद्वारे एकूण वस्तूंच्या मागणीचे रूपांतर पैशात करून त्यांची बेरीज करावी लागते.

फळांची मागणी ₹ 1 लाख + दुधाची मागणी ₹ 5 लाख + मोटारींची मागणी ₹ 50 लाख = एकूण मागणी ₹ 56 लाख.

**(3) मागणी व पुरवठ्यातील सुप्त संबंध :** अंशलक्षी पातळीवर उत्पादनाचा विचार करावयाचा झाल्यास एखाद्या वस्तूचे ग्राहक व ती वस्तू उत्पादन करणारे कामगार हे दोन्ही भिन्न व्यक्तिसमूह असतात व दोन्ही व्यक्ती आपले निर्णय स्वतंत्रपणे घेतात. तर समग्रलक्षी पातळीवर एकूण पुरवठ्याच्या बाजूने एकूण मागणीवर होणारा परिणाम विचारात घ्यावा लागतो.

**(4) मागणी आणि पुरवठ्यातील उत्पन्न हा दुवा :** एखाद्या वस्तूच्या संदर्भात मागणीतील बदल हा किमतीतील बदलांशी जोडला जातो. परंतु समग्रलक्षी पातळीवर मागणीतील बदल हा उत्पन्नाच्या पातळीतील जो बदल असतो त्याच्याशी जोडला जातो. यावरून समग्रलक्षी विश्लेषणात उत्पन्न हा मागणी व पुरवठा यांच्यातील दुवा आहे हे स्पष्ट होते.

**(5) एकूण पुरवठा व एकूण मागणी :** एकूण पुरवठा व एकूण मागणीचा संबंध उत्पन्नामुळे निर्माण होतो.

### 1.1.2 समग्रलक्षी (स्थूल) अर्थशास्त्राची व्याप्ती

समग्रलक्षी अर्थशास्त्र सामाजिक स्तरावर समाजाच्या असणाऱ्या अमर्याद गरजांचा विचार करून त्यातील जास्तीत जास्त गरजा मर्यादित व पर्यायी साधनांद्वारे कशा पूर्ण करायच्या याचा प्रयत्न करते. गरजांच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या आर्थिक समस्यांची सोडवणूक करण्यावर हे शास्त्र भर देते.

**(1) उत्पादन व रोजगारविषयक सिद्धान्त :** अर्थव्यवस्थेत उत्पन्न, श्रमिक, भूमी, भांडवल व इतर नैसर्गिक साधनसामग्री इत्यादींचा पूर्णपणे वापर केला जातो की नाही या विषयाची चर्चा उत्पन्न व रोजगार सिद्धान्तात केली जाते. वरील साधनांचा पूर्णपणे वापर केल्यास उत्पन्न व रोजगार पातळीत वाढ होते. देशाचे जास्तीत जास्त उत्पादन म्हणजेच वास्तव उत्पादन यावर अर्थशास्त्र भर देते.

**(2) उपभोग व गुंतवणूकविषयक सिद्धान्त :** समाजाचा भविष्यकालीन उपभोग हा वर्तमानकालीन गुंतवणुकीवर अवलंबून असतो, म्हणून उपभोग सिद्धान्त व गुंतवणूक सिद्धान्त समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यासात समाविष्ट होतात.

**(3) आर्थिक तेजी-मंदीच्या चक्राविषयीचा सिद्धान्त :** आर्थिक व्यवहारातील होणाऱ्या चढ-उतारांची म्हणजेच तेजी-मंदीच्या निर्मितीची कारणे कोणती ? याचा अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो ? तेजी-मंदीची तीव्रता कमी करण्यासाठी कोणती महत्त्वाची पावले उचलावीत या गोष्टींचा अभ्यास आर्थिक तेजी-मंदी चक्रात केला जातो.

**(4) सर्वसामान्य किंमतपातळीचा सिद्धान्त :** वस्तू व सेवांच्या पुरवठ्यानुसार पैशाच्या पुरवठ्यात बदल केला पाहिजे. समजा, वस्तू व सेवांच्या पुरवठ्यापेक्षा पैशाचा पुरवठा जास्त झाल्यास अर्थव्यवस्थेत भाववाढ निर्माण होईल.

याउलट, वस्तूंच्या पुरवठ्यापेक्षा पैशाचा पुरवठा कमी झाल्यास अर्थव्यवस्थेत चलनघटीचा प्रश्न निर्माण होईल. भाववाढ व चलनघट यांची कारणे तसेच त्यांचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम यांसारख्या प्रश्नांचा अभ्यास सर्वसामान्य किंमतपातळीत केला जातो.

**(5) आर्थिक अभिवृद्धीचा सिद्धान्त :** काही देशांचा आर्थिक वृद्धीचा दर हा कमी का राहतो तर काही देशांचा आर्थिक वृद्धीचा दर जास्त का असतो, तसेच देशाच्या आर्थिक वृद्धीच्या वाढीतील अडथळे दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात या संदर्भातील माहिती आर्थिक वृद्धीत मिळते.

**(6) विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धान्त :** आधुनिक काळात राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप श्रमिक व भांडवलदार वर्ग यांच्यात कसे होते, याचा अभ्यास विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धान्त या नावे समग्रलक्षी अर्थशास्त्र करते.

**(7) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धान्त :** आयात व निर्यात, गुंतवणूकयोग्य निधीचा आंतरराष्ट्रीय प्रभाव आणि आंतरराष्ट्रीय किमतींच्या हालचाली यांचा सर्व देशांच्या अर्थव्यवस्थांवर परिणाम होत असतो. यांसारख्या प्रश्नांचा विचार आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धान्त या समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या विभागात केला जातो.

### 1.1.3 समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्त्व व मर्यादा

***महत्त्व***

समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्त्व पुढीलप्रमाणे :

**(1) संपूर्ण अर्थव्यवस्थेचे यथार्थ ज्ञान :** अर्थव्यवस्थेपुढील महत्त्वाच्या आर्थिक समस्या या राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार, सामान्य किंमतपातळी इत्यादींशी संबंधित असतात. या बदलत्या घटकांचे मोजमाप करून त्याद्वारे अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करता येते.

**(2) आर्थिक धोरण ठरविण्यास उपयुक्त :** आर्थिक धोरणांचा संबंध संपूर्ण समाजाशी किंवा अर्थव्यवस्थेशी असतो. व्यापारचक्रविरोधी धोरण, चलनविषयक धोरण, सार्वजनिक आयव्ययाचे धोरण, आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण, करविषयक धोरण, खर्च धोरण इत्यादी धोरणांच्या बाबतीत स्थूल (समग्र) अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

**(3) व्यक्तिगत घटकांची वर्तणूक जाणून घेण्यासाठी महत्त्वाचे :** अर्थव्यवस्थेतील स्थूल निष्कर्षांच्या आधारावर सूक्ष्म निष्कर्ष तपासून पाहणे शक्य होते. त्यामुळे व्यक्तिगत घटकांची वर्तणूक जाणून घेण्यासाठी स्थूल अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

**(4) आर्थिक सिद्धान्ताची व्यावहारिक उपयोगिता :** स्थूल अर्थशास्त्रामुळे अनेक व्यावहारिक समस्यांचा उलगडा झाला. विविध निष्कर्ष सर्वेक्षण करून तपासणे शक्य झाले. प्रत्यक्ष व्यवहारात स्थूल अर्थशास्त्र उपयोगी पडू लागले. म्हणजेच या अर्थशास्त्राने आर्थिक सिद्धान्ताची व्यावहारिक उपयोगिता वाढविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

**(5) पैशाची मूल्यनिश्चिती :** पैशाच्या संख्येतील बदलाचा पैशाचे मूल्य आणि पर्यायाने सर्वसामान्य किंमतपातळीत घडून येणाऱ्या बदलांचे संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन स्थूल अर्थशास्त्रामुळे शक्य झाले आहे.

**(6) एकत्रित वर्तनाचे यथार्थ ज्ञान :** अर्थव्यवस्थेतील विविध घटकांच्या एकत्रित वर्तनाच्या यथार्थ ज्ञानासाठी स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

**(7) मार्गदर्शक :** जगातील बहुतेक अर्थव्यवस्था गतिमान बनल्यामुळे सतत परिवर्तने होत असतात. त्यामुळे नवीन आर्थिक प्रश्न उद्‌भवत असतात. हे प्रश्न सोडविण्यासाठी स्थूल अर्थशास्त्र मार्गदर्शक म्हणून कार्य करते.

***मर्यादा***

**(1) वैयक्तिक अनुभवांचे सामान्यीकरण करण्यावर मर्यादा :** काही वेळेस वैयक्तिक किंवा लहान समूहाचे निष्कर्ष संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी लागू पडत नाहीत. त्यासाठी वैयक्तिक अनुभवांचे काळजीपूर्वक सामान्यीकरण करावे लागते. ते हानिकारक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**(2) मापनाबाबत समस्या :** समूह किंवा समुच्चय विचारात घेताना एकजिनसी घटक असलेले समूह मिळणे कठीण असते.

वेगवेगळ्या वस्तू व सेवा मापनासाठी वेगवेगळी परिमाणे वापरली जातात. त्यामुळे दूध, वीज, साखर, कापड यांची बेरीज किंवा समूह करण्यात समस्या निर्माण होते. त्यांची बेरीज निरर्थक ठरते.

**(3) समाजाच्या रचनेकडे दुर्लक्ष :** स्थूल अर्थशास्त्र समाजरचनेकडे दुर्लक्ष करते. जोपर्यंत स्थूल अर्थशास्त्र समाजरचनेचा विचार करणार नाही तोपर्यंत त्यांचे निष्कर्ष प्रभावी ठरणार नाहीत.

**(4) सर्वसामान्य किंमतपातळी सदोष :** सर्वसामान्य किंमतपातळीचा अभ्यास करताना देशातील सर्व वस्तू व सेवांच्या किमतींचा एकत्रित विचार केला जातो. त्यात काही किमती कमी होणाऱ्या, काही वाढणाऱ्या तर काही स्थिर असतात. त्यामुळे सर्वसामान्य किंमतपातळीवरून अर्थव्यवस्थेतील किंमतबदलाची कल्पना येत नाही.

## 1.2 मुक्त अर्थव्यवस्थेतील चक्राकार प्रवाह

### 1.2.1 चक्राकार प्रवाह आणि आर्थिक क्रिया

अर्थव्यवस्थेत वस्तू आणि उत्पादन घटक यांचा पैशाशी सतत विनिमय होत असतो. एका कुटुंबाने दुसऱ्या कुटुंबाकडून एखादी वस्तू विकत घेतली तर एका कुटुंबाचा खर्च हा दुसऱ्याला उत्पन्न म्हणून मिळतो. आधुनिक अर्थव्यवस्थेत उत्पादन संघटित करण्याचे कार्य उद्योगसंस्था करीत असतात. कुटुंबाच्या उपभोगासाठी लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन उद्योगसंस्था करतात. उद्योगसंस्थांकडून येणारा उत्पन्नरूपी चलनी किंवा मौद्रिक प्रवाह कुटुंबाकडे जाऊन उपभोग खर्चाच्या रूपाने तो पुन्हा उद्योगसंस्थांकडे जातो. कुटुंबाचा खर्च

हे उद्योगसंस्थांचे उत्पन्न असते, तर उद्योगसंस्थांचा खर्च हे कुटुंबाचे उत्पन्न असते; अशा रीतीने चक्राकार फिरणारा प्रवाह असल्याने त्याला 'उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह' असे म्हणतात. यामुळे अर्थव्यवस्थेत एक विशिष्ट उत्पन्न आणि व्यवहार पातळी राखली जाते.

वेगवेगळ्या आर्थिक घटकांमधील संबंध स्पष्ट करण्यासाठी कुटुंबे, उद्योगसंस्था आणि सरकार किंवा उद्योगसंस्था आणि सरकार असे त्यांचे गट करता येतात. उत्पादन, उपभोग, भांडवलनिर्मिती यांसारख्या आर्थिक क्रियांमार्फत ते एकमेकांशी संबंधित असतात. तसेच ते इतर जगाशीदेखील संबंधित असतात. या वेगवेगळ्या संबंधांमुळे आर्थिक क्रियांचा चक्राकार प्रवाह निर्माण होत असतो. आर्थिक क्रियांच्या चक्राकार प्रवाहाची नोंद घेणारा केन्स हा पहिला अर्थशास्त्रज्ञ आहे. अर्थव्यवस्थेत वस्तू व सेवांच्या उत्पादनाचे कार्य उत्पादन घटकांमार्फत चालत असते. व्यावसायिक आणि उत्पादनसंस्थांनी निर्माण केलेल्या वस्तू आणि सेवांवर उपभोक्ते त्यांचे उत्पन्न खर्च करीत असतात आणि त्याचे मोबदले उत्पादक हे उपभोक्त्यांना व्याज, वेतन, खंड आणि नफ्याच्या स्वरूपात देत असतात. कारण उपभोक्ते उत्पादन घटकांचे मालक असून हेच उत्पन्न उपभोक्ते पुन्हा खर्च करीत असतात. उत्पादनसंस्थांचा खर्च म्हणजे उत्पादन घटकांचे उत्पन्न होय. उपभोक्त्यांनी केलेल्या खर्चावरच उत्पादकांचे/उद्योगसंस्थांचे उत्पन्न अवलंबून असते. बचत आणि गुंतवणूक सारखी असली म्हणजे अर्थव्यवस्थेत समतोल राहतो असे केन्सचे मत आहे. म्हणजेच उत्पन्नाच्या स्वरूपात जे मिळविले असेल ते उपभोगावर किंवा गुंतवणुकीवर खर्च झाले पाहिजे.

$Y$ = उत्पन्न $\quad Y = C + S$ जर उत्पन्न $Y$ = खर्च असेल तर,

$C$ = उपभोग खर्च $\quad Y = C + I = C + S$ येते. म्हणजेच बचत आणि गुंतवणूक समान $(I = S)$ होते.

$I$ = गुंतवणूक खर्च

$S$ = बचत

## 1.2.2 द्वि-क्षेत्रीय प्रतिमान

या प्रतिमानात कौटुंबिक आणि व्यवसाय क्षेत्रे लक्षात घेतली जातात. कौटुंबिक घटकाकडे सर्व घटकांची मालकी असते. कौटुंबिक क्षेत्र हे उपभोक्ता घटक असून त्याचे ध्येय कौटुंबिक सदस्यांच्या गरजांची पूर्तता करणे हे असते. उद्योगसंस्था कौटुंबिक क्षेत्राकडून आर्थिक संसाधने घेतात आणि त्या बदल्यात त्यांना वस्तू आणि सेवा देत असतात. या विनिमयाला 'वास्तव प्रवाह' म्हणतात. परंतु अलीकडच्या काळात विनिमय माध्यम म्हणून पैशाचा वापर केला जातो. वस्तू आणि सेवांची विक्री करून त्या बदल्यात पैसा दिला किंवा घेतला जातो. म्हणजेच एका बाजूने वस्तू आणि सेवांचा प्रवाह तर विरूद्ध बाजूने पैशाचा प्रवाह दोन्हीही समान होतात.

### *गृहीते*


1. अर्थव्यवस्था बंदिस्त आहे. परकीय व्यापारक्षेत्र नाही.

2. उत्पादक जे उत्पादित करतात ते सर्व विकतात म्हणजेच व्यवसाय क्षेत्रात वस्तूंचा साठा राहत नाही.
3. व्यवसाय क्षेत्रामध्ये फक्त उत्पादन होत असते.
4. सरकारचे कर किंवा खर्च अशा स्वरूपाचे व्यवहार नसतात.
5. उपभोक्ते त्यांचे सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च करतात.

या गृहीतांनुसार उत्पादन हे विक्रीइतके असून खर्च हा उत्पन्नाबरोबर असतो. त्यामुळे चक्राकार प्रवाह पूर्ण होतो. परंतु वरील गृहीतांनुसार अर्थव्यवस्थेत चक्राकार प्रवाह टिकवून ठेवणे अवघड जाते. चक्राकार प्रवाह अवघड होण्याचे कारण म्हणजे उत्पन्न प्रवाहात पडणारी भर (अंतःक्षेपण) किंवा निर्माण होणारी गळती (संहरण) होय. या व्यवहारात समन्वय साधता आला तर उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह कायम राहतो. द्वि-क्षेत्रीय प्रतिमानामध्ये कौटुंबिक क्षेत्राकडून केल्या जाणाऱ्या बचतीमुळे गळती निर्माण होत असते. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते बचत आणि गुंतवणुकीसाठी बाह्य प्रेरणांची आवश्यकता असते. चलनविषयक धोरणामुळे बचत किंवा गुंतवणूक निर्माण होण्यास मदत मिळते.

## 1.2.3 कुटुंबसंस्था आणि उद्योगसंस्था यांच्या संदर्भात उत्पन्न प्रवाहाचे विश्लेषण

**(1) उद्योगसंस्था व कुटुंबसंस्था यांच्यातील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह (Circular Flow of Income between Firms and Households) :** अर्थव्यवस्थेतील पैसा व वस्तू यांच्या अखंड चक्राकार हालचालीस 'चक्राकार प्रवाह' असे म्हणतात. या हालचाली कुटुंबाकडून व्यवसायसंस्थांकडे व व्यवसाय संस्थांकडून कुटुंबाकडे होणाऱ्या पैशांच्या व वस्तूंच्या प्रवाहाचे दिग्दर्शन करतात.




**आकृती क्र. 1.1 : घटक बाजार**

अर्थव्यवस्थेत उद्योगसंस्था उत्पादन करतात. कुटुंबे त्या उत्पादनाचा उपभोग घेतात. उत्पादनाचे घटक ज्या कुटुंबाच्या मालकीचे असतात त्यांच्याकडून उद्योगसंस्था हे घटक खरेदी करतात. वेतन देऊन श्रम खरेदी करतात. भूमी वापराबद्दल भाडे देतात व भांडवलाच्या वापराबद्दल व्याज देतात. उद्योजकांच्या सेवा कुटुंबसंस्था पुरवितात व त्याबद्दल उद्योगसंस्था त्यांना नफा-लाभांश देतात. अशा प्रकारे कुटुंबांना वेगवेगळ्या मार्गांनी मिळणारे उत्पन्न, कुटुंबसंस्था उद्योगसंस्थांकडून वस्तू घेण्याकरिता खर्च करतात. पुढील आकृतीने हे स्पष्ट होईल.


या आकृतीत वस्तू व सेवा यांचा प्रवाह खालच्या भागात दर्शविला आहे. वस्तूंच्या बाजारात विक्री व सेवा यांची खरेदी-विक्री होते. येथे कुटुंबे ग्राहक असतात तर उद्योगसंस्था विक्रेत्या असतात. आकृतीच्या वरच्या भागात कुटुंबे उद्योगसंस्थांना भूमी, श्रम, भांडवल व संयोजन हे उत्पादन घटक पुरवितात. भूमीबद्दल खंड, भांडवलाबद्दल व्याज, श्रमाबद्दल वेतन व उद्योजकांच्या संयोजन कुशलतेबद्दल नफा व लाभांश देण्याचे काम उद्योगसंस्था करतात. उत्पादन घटकांची खरेदी-विक्री या बाजारात चालते. म्हणून यास घटक बाजार असे म्हणतात. आकृतीच्या वरच्या भागात घटक बाजार दर्शविला आहे. घटक बाजरात कुटुंबे ही विक्रेत्यांची भूमिका करतात. तर उद्योगसंस्था घटकांची मागणी करतात म्हणून त्या ग्राहकांची भूमिका करतात.

**(2) चलनी अगर मौद्रिक आणि वास्तव प्रवाह (Monetary and Real Flow) :** चलनी व वास्तव प्रवाहाच्या संदर्भात उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह दर्शविता येईल.

आकृतीत वरच्या बाजूला उद्योगसंस्थांकडून कुटुंबांकडे जाणारा चलनी प्रवाह उत्पन्नाच्या स्वरूपात आहे तर खालच्या बाजूला कुटुंबांकडून उद्योगसंस्थांकडे केल्या जाणाऱ्या मागणीचे स्वरूप वस्तू व सेवा यांच्या वास्तव प्रवाहाच्या स्वरूपात आहे.

कुटुंबाचा खर्च हे उद्योगसंस्थांचे उत्पन्न असते. तर उद्योगसंस्थांचा खर्च हे कुटुंबाचे उत्पन्न असते. अशा प्रकारे हा उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह निर्माण होतो.

वास्तव प्रवाहाची पैशात व्यक्त झालेली किंमत चलनी प्रवाहाच्या स्वरूपात दिसते. उद्योगसंस्थांचा खर्च हा कुटुंबाचे उत्पन्न असल्याने व कुटुंबांचे उत्पन्न हा उद्योगसंस्थांचा खर्च असल्याने एकूण उत्पन्न व एकूण खर्च समान असतात.




**आकृती क्र. 1.2**

**(3) चक्राकार प्रवाहातील अंतःक्षेपण व संहरण (Injections and Withdrawals in the Circular Flow of Income) :** कधी-कधी कुटुंबांच्या उत्पन्नात झालेली वाढ उद्योगसंस्थांच्या खर्चवाढीमुळे झालेली नसते. तसेच उद्योगसंस्थांच्या उत्पन्नातील वाढ कुटुंबांच्या खर्चातील वाढीमुळे झालेली नसते. तर हे वाढलेले उत्पन्न बाहेरून उत्पन्न प्रवाहात घातले जाते. या क्रियेला 'अंतःक्षेपण'

